# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**येवला (जि.नाशिक) तालुक्यातील पुर्व भागातील टंचाईग्रस्त शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ मिळणेबाबत**

**(१) ५९९७ (०७-०४-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) मुख्य अभियंता लघुसिंचन (जलसंधारण) पुणे यांच्याकडून साठवण तलाव ममदापुर (ता.येवला, जि.नाशिक) या योजनेचा प्रस्ताव सचिव समितीच्या मान्यतेसाठी दिनांक ८ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे पाठविण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेसाठी दिनांक २० ऑगस्ट, २०१४ रोजी निधी मंजूर करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, येवला तालुक्यातील पुर्व भागातील टंचाईग्रस्त शेतक-यांना सिंचनाचा लाभ मिळणेसाठी शासनाकडून प्रश्न भाग (१) मधील प्रस्ताव मंजूर करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीही कार्यवाही केलेली नसल्यास, विलंबाची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१६) :**(१) होय,

(२) नाही.

तथापि, सदर योजनेस जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नाशिक यांचे मार्फत दिनांक २०/०८/२०१४ रोजी सचिव समितीच्या मान्यतेच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे,

(३) जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, नाशिक यांचे दिनांक २०/०८/२०१४ चे आदेशानुसार प्रस्तावित कामास जिल्हा बिगर आदिवासी योजना सन २०१४-१५ अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करुन त्यानंतर नियोजन विभागाच्या दिनांक ०८ जानेवारी २०१४ च्या परिपत्रकान्वये रुपये ५.०० कोटीपेक्षा जास्त (रु.६४५.६४ लक्ष) किमतीचा असल्यामुळे

सचिव समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला. तथापि, रुपये ५.०० कोटी व त्यापेक्षा जास्त खर्चाच्या कार्यालयीन व निवास इमारतीच्या बांधकामाचे प्रस्ताव सचिव समितीच्या मान्यतेस्तव सादर करण्याबाबतचे नियोजन विभागाचे दिनांक ३० जानेवारी २०१२ च्या परिपत्रकान्वये आदेशित केले असल्याने तसेच सदर आदेश इमारत बांधकामासाठीच असल्याने प्रस्तुत योजनेबाबतचा प्रस्ताव पुढील कार्यवाहीकीरता मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) महाराष्ट्र राज्य, पुणे-६ यांचेकडे परत करण्यात आलेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील जिल्हा स्त्री रुग्णालयाचे विस्तारीकरण व बांधकामाबाबत**

**(२) १०२७६ (०९-०४-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), डॉ.पंकज भोयर (वर्धा), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्ह्यातील जिल्हा स्त्री रुग्णालयाचे विस्तारीकरण व बांधकामास शासन निर्णय क्र.प्रशामा/२०१३/प्रक१६७/आरोग्य-३ दिनांक १२ एप्रिल, २०१३ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळाली असून सन २०१३-२०१४ च्या अर्थसंकल्पात ३९६.६५ लक्ष रुपये एवढ्या निधीची तरतूद करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रुग्णालयाच्या बांधकामाचे सुधारीत आराखडे मंजुरीस्तव मुख्य वास्तुशास्त्रज्ञ, मुंबई यांचेकडे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या आराखड्यास मान्यता प्रदान करण्यात आली आहे काय, असल्यास कामाचे प्रारंभ आदेश किती दिवसात काढण्यात येतील,
(४) नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यांनतर कार्यारंभ आदेश काढण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील भुजल पातळी वाढीसाठी केळकर समितीने केलेल्या शिफारशीबाबत**

**(३) १०४१३ (०७-०४-२०१६). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील भुजल पातळी वाढीसाठी राज्यातील ८५ तालुक्यात कामे घेणारे असल्याचा अहवाल केळकर समितीने राज्य सरकारला देण्यात येवून या कामासाठी १७०० कोटी रूपयांच्या निधीची शिफारस केली असल्याचे माहे जानेवारी २०१५ रोजी अथवा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील भुजल पातळी वाढीसाठी होणाऱ्या कामांसाठी मागणी केलेल्या निधीची तरतुद करण्यासंदर्भातील शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, निधीची तरतुदीची कार्यवाही होत असल्यास भुजल पातळी वाढीच्या कामामध्ये नदी खोलीकरण व रूंदीकरणाच्या कामाचा समावेश करण्यात येणार आहे काय,
(४) समावेश करण्यात येणार असल्यास केव्हा व किती दिवसात करणार ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे,
अहवालातील शिफारस क्र.६.१(४) मध्ये भूस्तर प्रतिकुल असलेले ८५ तालुक्यासाठी रु. १७३२ कोटी नियतवाटपाची केळकर समितीने शिफारस केलेली आहे.
(२) राज्यात सातत्याने निर्माण होत असलेल्या टंचाई परिस्थितीवर कायमस्वरुपी मात करण्याकरीता राज्यात जलयुक्त शिवार अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने दिनांक ५ डिसेंबर, २०१४ रोजी घेतला असून या अभियाना अंतर्गत दरवर्षी ५००० गावे या प्रमाणे पुढील ५ वर्षात २५००० गावे टंचाईमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. तसेच सन २०१५-१६ मध्ये निवड केलेल्या गावांकरीता रु. २००० कोटी इतका विशेष निधी जिल्हा नियोजन वितरण समिती च्या माध्यमातुन उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे,
(३) होय,
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यातील रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी आरोग्य सहाय्यक व इतर कर्मचारी यांनी अनेक पदे रिक्त असल्याबाबत

**(४) १३७७६ (०८-०४-२०१५). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) तालुक्यात पाच प्राथमिक आरोग्य केंद्र व एक ग्रामीण रुग्णालय असून रुग्णालयामध्ये वैद्यकीय अधिकारी आरोग्य सहाय्यक व इतर कर्मचारी यांची अनेक पदे रिक्त असल्यामुळे रुग्णांना वेळेवर व नियमित आरोग्य सेवा मिळत नाही व त्यामुळे गरीब रुग्णांना खासगी रुग्णालयात उपचार द्यावे लागत असल्यामुळे तीव्र असंतोष व संतापाची भावना पसरली असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू रुग्णालयात रिक्त असलेली पदे त्वरीत भरण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा तालुक्यात ५ प्राथमिक आरोग्य केंद्रे व एक ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित आहे. सदर आरोग्य संस्थांमध्ये सद्य:स्थितीत एकूण १४८ पदे मंजूर असून त्यापैकी १२३ पदे भरलेली आहेत. रिक्त पदांच्या ठिकाणी कार्यरत अधिकारी /कर्मचाऱ्यांकडे अतिरिक्त कार्यभार देऊन रुग्णसेवा नियमित सुरु राहील याची दक्षता घेण्यात येते. ग्रामीण रुग्णालय, मंगळवेढा येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांच्या ठिकाणी “आरबीएसके” योजनेमधील वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत रुग्णसेवा पुरविण्यात येते.

(२) महाराष्ट्र वैद्यकीय आरोग्य सेवा संवर्गाची रिक्त पदे सरळसेवेने आणि पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही सुरु आहे. माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वैद्यकीय सेवा गट- अ संवर्गातील २६ वैद्यकीय अधिकाऱ्यांना समुपदेशनाद्वारे सोलापूर जिल्ह्यामध्ये नामनिर्देशनाने नियुक्ती देण्यात आली असून एका वैद्यकीय अधिकाऱ्यांची नियुक्ती ग्रामीण रुग्णालय, मंगळवेढा येथे करण्यात आली आहे. गट-क व गट- ड संवर्गातील रिक्त पदे भरण्याबाबतची कार्यवाही जिल्हा स्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर नसल्याने संतप्त झालेल्या जमावाने रुग्णालयाची तोडफोड केल्याबाबत**

**(५) १४८६२ (०८-०४-२०१५). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंदखेडराजा (जि.बुलढाणा) येथील ग्रामीण रुग्णालयात डॉक्टर नसल्याने संतप्त झालेल्या जमावाने रुग्णालयाची दिनांक २७ डिसेंबर, २०१४ रोजी तोडफोड केली, हे खरे आहे काय,

(२) तसेच रुग्णालयात डॉक्टर, नर्स कोणीही नसल्यामुळे हृदयविकाराचा झटका आलेल्या व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना त्यावेळी रुग्णालयात घडली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार पुढे कोणती कारवाई करण्यात आली आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :**(१) व (२) अंशत: खरे आहे.

दिनांक २७.११.२०१४ रोजी एका इसमास मृत्यू झाल्यानंतर ग्रामीण रुग्णालय, सिंदखेडराजा, जि.बुलढाणा येथे आणण्यात आले. त्यावेळी १ वैद्यकीय अधिकारी व १ अधिपरिचारीका रुग्णालयात हजर होते व त्यांनी सदर इसमास तपासणीअंती मृत घोषित केले. त्यामुळे मृत इसमासोबत आलेल्या जमावाकडून किरकोळ स्वरुपात रुग्णालयाची तोडफोड करण्यात आली.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## विठ्ठल सायन्ना जिल्हा रुग्णालय (जिल्हा ठाणे) (सिव्हील) येथे वेळेत स्ट्रेचर न मिळाल्याने एका बाळंतीणीचा झालेला मृत्यु

**(६) १९३३९ (१४-०८-२०१५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयातील विठ्ठल सायन्ना जिल्हा रुग्णालय (सिव्हील) ठाणे येथे माहे मार्च, २०१५ मध्ये वेळेत स्ट्रेचर न मिळाल्याने उषा धमेंद्र पवार या २४ वर्षीय बाळतींणीचा रुग्णवाहिकेतच मृत्यु झाल्याची घटना घडली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती बाळतींणीच्या मृत्युस कारणीभुत असलेल्या संबंधित वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कोणती कडक कारवाई करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कारवाई केली नसल्यास, दिरंगाईची कारणे कोणती ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :**(१) व (२) हे खरे नाही, तथापि बाळंतीणीच्या मृत्यूबाबत स्थानिक वृत्तपत्रात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने प्राथमिक चौकशी करण्यात आली आहे.

(३) श्रीमती उषा पवार या बाळंतीणीचा मृत्यू अतिदक्षता विभागामध्ये दाखल झाल्यानंतर झाला आहे. प्राथमिक चौकशीमध्ये दोषी आढळून आलेल्या इंदिरा गांधी स्मृती रुग्णालयातील वैद्यकीय अधिक्षक, व एक वैद्यकीय अधिकारी व दोन परिचारीकांना निलंबित करण्यात आले आहे तसेच एका कंत्राटी वैद्यकीय अधिकाऱ्याची सेवा समाप्त करण्यात आली आहे. सामान्य रुग्णालय, ठाणे येथील एका अधिपरिचारीकेस निलंबित करण्यात आले असून जिल्हा शल्य चिकित्सक व अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक यांचा खुलासा मागविण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या माध्यमातून आयपीएचएस रुग्णालयांमध्ये सेवा देणाऱ्या विशेषज्ञांना प्रतिमहा मानधन देण्याबाबत

**(७) १९४९५ (१७-०८-२०१५). श्री.वैभव नाईक (कुडाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या माध्यमातून आयपीएचएस रुग्णालयांमध्ये सेवा देणा-या विशेषज्ञांना प्रतिमहा ६० हजार रुपये मानधन देण्याच्या सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात विशेषज्ञांना ४० हजार मानधन दिले जाते मात्र ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्गमध्ये डॉक्टर मिळत नसल्याने त्यांना ६० हजार रुपये मानधन देण्याची आदेश असतांनाही त्यांना अजूनाही २५ हजार रुपये मानधन दिले जात असल्याचे नुकतेच आहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने सखेल चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, तद् नुसार शसन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०३-२०१६) :**(१) राज्यातील रुग्णालयामध्ये विशेषतज्ञांच्या सेवा उपलब्ध होण्यासाठी आयपीएचएस कार्यक्रमांतर्गत खालील प्रमाणे दरमहा मानधन देण्यात येते.

| रुग्णालये | मानधन |
|---|---|
| (१) नक्षलग्रस्त व समुद्रकिनाऱ्या लगतच्या जिल्ह्यातील रुग्णालये (ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग इ.) | रु.६०,०००/- |
| (२) आदिवासी भागातील रुग्णालये | रु.५५,०००/- |
| (३) उर्वरित भागातील रुग्णालये | रु.५०,०००/- |

(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### औसा (जि.लातूर) येथील रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी अनुपस्थितीत असल्यामुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

**(८) २१०३५ (१६-०९-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औसा (जि.लातूर) येथील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी रजेवर असल्याने त्यावेळी पर्यायी वैद्यकीय अधिकाऱ्यांची व्यवस्था करण्यात आली नसल्याने रुग्णांची उपचाराअभावी गैरसोय होत असल्याची बाब दिनांक २६ मे, २०१५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व संबंधित वैद्यकीय अधिकाऱ्यांना रजा मंजूर करताना रुग्णांची उपचाराअभावी गैरसोय होऊ नये याची वरिष्ठ अधिकाऱ्यांने दखल न घेतल्या प्रकरणी कोणती कार्यवाही शासन स्तरावर करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) चौकशी करण्यात आली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

ग्रामीण रुग्णालय औसा, जि.लातूर येथील एक वैद्यकीय अधिकारी माहे मे, २०१५ मध्ये रजेवर होते. त्यांच्या सदर रजेच्या कालावधीमये अन्य दोन वैद्यकीय अधिकाऱ्यांची प्रतिनियुक्ती औसा येथे करण्या तआली होती व त्यांच्यामार्फत तेथील रुग्णांना रुग्णसेवा देण्यात येत होती. त्यामुळ रुग्णांची गैरसोय झाल्याचे आढळून आलेले नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांना मोफत उपचार घेण्यासाठी राजीव गांधी जीवनदायी योजनेचा लाभ होत नसल्याबाबत**

**(९) २१४३८ (१४-०८-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णाला मोफत उपचार देण्यासाठी राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना राबविण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपचारात दिरंगाईसह शासनाकडून निधी मिळत असताना रुग्णाकडून पैशाची मागणी करून गोरगरीब रुग्णाची फसवणूक होत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, विविध प्रकारच्या ९७१ आजारावर ही सेवा उपलब्ध असताना गरीब रुग्णांना त्याचा काहीच लाभ होत नाही,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शहरातील काही खाजगी हॉस्पीटल शासकीय अनुदान मिळत असुनसुध्दा रुग्णाकडून सुध्दा पैसे घेण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली आहे काय ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) होय.

(२), (३), (४) व (५) अंशत: खरे आहे. अकोला जिल्ह्यातील काही रुग्णालयांची रुग्णाकडून पैशाची मागणी केलल्या अथवा पैसे घेतल्याच्या १४ तक्रारी प्राप्त झाल्या असून त्या निकाली काढण्यात आल्या आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित रुग्णालयांना टी.पी.ए. मार्फत ताकीद, सुचना तसेच नोटीस बजावण्यात आलेल्या आहेत.

राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेअंतर्ग अकोला जिल्ह्यातील १४ रुग्णालयांमध्ये दि. १ सप्टेंबर, २०१५ पर्यत ७७९९ उपचार / शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

---

**भंडारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयात रिक्त पदे तसेच सोयी सुविधांचा अभाव असल्याबाबत**

**(१०) २१५१३ (१७-०८-२०१५). श्री.राजेश काशीवार (साकोली) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय व ग्रामीण रुग्णालयातसुध्दा वैद्यकीय अधिकारी, वर्ग ३ तसेच वर्ग ४ ची मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रुग्णालयांमध्ये औषधांचा साठा कमी पडत असून सिटीस्कॅन आणि एक्स-रे सारख्या मशिन वारंवार बंद पडत असतात, त्यामुळे ग्रामीण भागातील गरीब आदिवासी नागरिकांना औषध घेण्यासाठी खाजगी ठिकाणी एक्स-रे व सीटीस्कॅन करावे लागते, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, भंडारा येथील जिल्हा सामान्य रुग्णालय व जिल्ह्यातील संपुर्ण ग्रामिण रुग्णालयांमध्ये रिक्त असलेली पदे तात्काळ भरुन औषधांचा पुरवठा करणेसंबंधी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६)** :(१) अंशत: खरे आहे.

भंडारा जिल्ह्यामध्ये १ जिल्हा रुग्णालय, २ उप जिल्हा रुग्णालये आणि ७ ग्रामीण रुग्णालये कार्यान्वित आहेत. सदर रुग्णालयांमध्ये वर्ग- १ ते वर्ग-४ ची एकूण ९२२ मंजूर पदांपैकी ६५६ पदे भरलेली आहेत व २६६ पदे रिक्त आहेत.

(२) अंशत: खरे आहे.

सदर रुग्णालयांमध्ये औषधांचा साठा पुरेश्या प्रमाणात उपलब्ध आहे व एक्स-रे मशीन सुरु आहे. तथापि सीटी स्कॅन मशीन बंद असून ते निर्लेखित करण्याबाबत कार्यवाहीसुरु आहे.

(३) भंडारा जिल्ह्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत रुग्णालयामधील वर्ग-१ संवर्गाची पदे पदोन्नतीने भरण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु असून नामनिर्देशनाने पदे भरण्याकरिता मागणीपत्र सादर करण्यात आले.

वैद्यकीय अधिकारी गट-अ संवर्गाची रिक्त पदे स्वतंत्र निवड मंडळामार्फत भरण्यात येत असून माहे स्पटेंबर, २०१५ मध्ये समुपदेशनाद्वारे ६ विशेषज्ञ आणि ५ एमबीबीएस अर्हताधारक वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती देण्यात आली आहे.

वर्ग-३ व वर्ग-४ संवर्गाची पदे भरण्याबाबतची कार्यवाही उप संचालक स्तरावर सुरु आहे.

---

**नैसर्गिक आपत्ती व महामार्गावरील अपघातग्रस्तांना त्वरीत वैद्यकीय सुविधा मिळण्याबाबत**

**(११) २२६९० (१४-०८-२०१५). श्री.सुनिल शिंदे (वरळी), अॅड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नैसर्गिक आपत्ती व महामार्गावरील अपघातग्रस्तांना त्वरित वैद्यकीय सुविधा मिळण्याबाबत महाराष्ट्र पिछाडीवर असून आपात्कालीन वैद्यकीय सुवधिा देण्याबाबत शासनाने दोन महिन्यात योजना राबविण्याचा आदेश मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये शासनाने आखलेल्या योजनेचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदरहू योजना राज्यात किती कालावधीत राबविणे अपेक्षित आहे आणि सदरहू योजनेची राज्यात तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाकडून आजतागायत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :**(१) हे अंशत: खरे आहे.

नैसर्गिक आपत्ती व महामार्गावरल अपघातग्रस्तांना त्वरीत वैद्यकीय सेवा मिळण्याबाबत लवकरात लवकर योजना राबवावी असे आदेश मा.मुंबई उच्च न्यायालय यांच्याकडून देण्यात आले होते. परंतु वैद्यकिय सुविधाबाबत महाराष्ट्र राज्य हे पिछाडीवर नाही.

(२) महाराष्ट्र राज्यात आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्प राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातुन राबविण्यात येत आहे. संपूर्ण राज्यासाठी एकूण ९३७ रुग्णवाहीका खरेदी करुन अत्याधुनिक उपकरणे, औषधे, व प्रशिक्षीत डॉक्टर व कर्मचारी यांच्यासह रुग्णवाहीका उपलब्ध करण्यात आल्या आहेत. रुग्णवाहिका त्वरीत उपलब्ध करण्यासाठी पुणे येथे स्वयंचलित व अत्याधुनिक संगणक प्रणालीसह एक कॉल सेंटर उभारण्यात आले आहे. संपूर्ण राज्यासाठी १०८ हा टोल फ्री क्रमांक निश्चित केला असून आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास १०८ क्रमांकावर दुरध्वनी करुन रुग्णांचे नाव व ठिकाण, असलेली परिस्थिती नमुद करुन २० ते ३० मि. रुग्णवाहीका पाठविली जाते व रुग्णांवर उपचार सुरु करुनच नजीकच्या रुग्णालयात रुग्णांस पोचवावयाचे काम करण्यात येत आहे. अशा प्रकारे मिळालेल्या उपचारामुळे रुग्णांचा व अपघातग्रस्तांचे प्राण वाचण्यास मदत होत आहे.

(३) माहे मार्च, २०१४ पासुन पुढील पाच वर्षासाठी महाराष्ट्र राज्यात आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्प राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या माध्यमातुन राबविण्यात येत आहे. आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास राबविण्यात येत आहे. आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास १०८ क्रमांकावर दुरध्वनी करुन रुग्णाचे नाव व ठिकाण, असलेली परिस्थिती नमुद करुन २० ते ३० मि. रुग्णवाहीका पाठविली जाते व रुग्णांवर उपचार सुरु करुनच नजीकच्या रुग्णालयात रुग्णांस उपचार सुरु पोचवावयाचे काम करण्यात येत आहे. अशा प्रकारे सद्यस्थितीमध्ये ४६०६९१ इतक्या रुग्णांना सेवा देण्यात आल्या आहेत. तसेच ४८३० इतक्या प्रसुती रुग्णवाहिकेमध्ये यशस्वीपणे हाताळण्यात आल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयात जिल्हा रुग्णालयाच्या रात्रपाळीच्या परिचारिकेवर रुग्णाच्या नातेवाईकांकडून अतिप्रसंग करण्यात आल्याबाबत.**

**(१२) २३१६० (१७-०८-२०१५). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १९ मे, २०१५ रोजी नाशिक जिल्हा रुग्णालयात रात्रपाळीला असलेल्या परिचारीकेवर रुग्णांच्या नातेवाईकांना अतिप्रसंग करण्याचा दुर्देवी प्रसंग घडल्यानंतर प्रदिर्घ काळ रुग्णालय प्रशासनाकडून गुन्हा दाखल करण्याबाबत कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार सदर गंभीर प्रकरणाची दखल न घेणाऱ्या रुग्णालय प्रशासनावर शासनमार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२४-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही. सदर घटनेबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांनी दि.२०/५/२०१५ रोजी सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक यांना लेखी कळविले आहे.

(२) व (३) निवासी वैद्यकीय अधिकारी (बाह्यसंपर्क) आणि अधिसेविका यांनी सदर घटनेबाबत चौकशी करुन दि. १९/५/२०१५ रोजी अहवाल सादर केला. संबंधित परिचारिकेस लेखी तक्रार देण्याबाबत वारंवार सांगूनही त्यांनी दि. २१/५/२०१५ पर्यंत तक्रार दिली नाही. दिनांक २२/५/२०१५ रोजी सदर परिचारिकेने तक्रार दिल्यानंतर जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांनी दि. २५/५/२०१५ रोजी सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक येथे सदर घटनेच्या चौकशीसाठी पत्र सादर केले असून सरकारवाडा पोलीस स्टेशन, नाशिक यांचेकडून पुढील तपास सुरु आहे.

---

## जळगांव जिल्हयात एनआरएचएम अंतर्गत गत वर्षाच्या प्राप्त निधीतील २०% निधी अखर्चित राहिल्याबाबत

**(१३) २३७७६ (१७-०८-२०१५). श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव जिल्हयात एनआरएचएम अंतर्गत गेल्या वर्षीच्या प्राप्त निधीतील २० टक्के निधी खर्च होऊ शकला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे एनआरएचएम अंतर्गत येणा-या विविध सेवा सुविधांपासून ग्रामीण व दुर्गम भागातील गरीब महिला व बालकांपर्यंत गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा पुरविणे हा मुख्य उद्देश साध्य करण्यास आरोग्य विभागाला यश मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या अभियानांमार्फत गर्भवतीची काळजी हा एक प्रमुख मुद्दा असून १६ टक्के गर्भव्यक्तीची काळजी घेतली गेली असे, दिनांक २१ फेब्रुवारी, २०१५ च्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांनी घेतलेल्या आढावा बैठकीत समोर आला होता हे खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाकडून सर्व सुविधा पुरविण्यात येत असतांना स्थानिक पातळीवर सुविधा पुरविण्यास आरोग्य विभाग कमी पडत आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, या अभियांची जळगांव जिल्हयात प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासन काय उपाययोजना करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (३०-०३-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

सन २०१४-१५ साठी जळगाव जिल्हयाकरिता राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत रु. ३४५०.१० कोटी मंजूर करण्यात आले होते. त्यापैकी रु. २८१०.४४ कोटी म्हणजेच ८१ टक्के निधी खर्च झालेला आहे.

(२) हे खरे नाही.

जळगाव जिल्हयामध्ये राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत पुरविण्यात आलेल्या सेवांबाबतचे ७३% ते १०५% पर्यंत उद्दीष्ट प्राप्त करण्यात यश मिळाले असून यापैकी काही महत्वाच्या सेवांबाबतचा तपशील पुढील प्रमाणे आहे :-

| आरोग्य सेवा | उद्दिष्ट | साध्य |
|---|---|---|
| गरोदर माताची नोंदणी | ६८९६२ | ७२५०५ (१०५%) |
| संपूर्ण संरक्षित माता | ६८९६२ | ५८८६६ (८५%) |
| संस्थात्मक प्रसुती | ६५५३६ | ६२३४९ (९५%) |
| बालकांना प्रथम १ तासात स्तनपान देणे | ६५४०४ | ५००६७ (७७%) |
| SNCU | २५७० | १८८५ (७३%) |
| NRC | १४९ | १३८ (९२%) |
| बालकांना संपूर्ण लसीकरण | ६२६९२ | ६१०७२ (९७%) |

(३) हे खरे नाही.

जानेवारी, २०१५ अखेर नोंदणी ४ प्रसवपूर्व तपासण्या, धनुर्वात प्रतिबंधक लस व लोहयुक्त गोळ्या इत्यादी सेवा देऊन ६९ टक्के मातांना पूर्ण संरक्षित करण्यात आलेले असून जळगाव जिल्ह्यामध्ये रा.ग्रा.आ.अ.ची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे कोरटा (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथील कोरटा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या विविध समस्यांबाबत**

**(१४) २४५८१ (१७-०८-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोरटा (ता.उमरखेड, जि.यवतमाळ) येथे ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा उपलब्ध व्हावी या करीता कोरटा प्राथमिक आरोग्य केंद्राची स्थापना करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोरटा आरोग्य केंद्रात आरोग्य सेवक, कनिष्ठ सहायक, परिचर, सफाई कामगार इत्यादी पदे रिक्त असून आरोग्य केंद्रात दोन वैद्यकीय अधिकारी कार्यरत असतांना त्यांनी स्वत:चे मर्जी प्रमाणे आठवड्यातील तीन दिवस एक वैद्यकीय अधिकारी व दुसरे तीन दिवस दुसऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याने स्वत:ची ड्युटी लावून घेतली आहे, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियुक्त कर्मचाऱ्यांच्या कामचुकारामुळे रुग्णांना उपचाराविनाच परत जावे लागते, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, प्रशासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली, येत आहे व कसे ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) कार्यरत डॉक्टरला पदव्युत्तर शिक्षणाकरिता कार्यमुक्त केल्याने मार्गदर्शक सुचनेनुसार तात्पुरती या प्रकारची व्यवस्था करण्यात आली होती.

(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नाशिक जिल्ह्यामध्ये आयोजित शिबीरांमध्ये रुग्णांना जेवण न देता केवळ कांदा पोहे किंवा खिचडी देऊन अनुदान लाटण्याचा प्रकार

**(१५) २४६२२ (१७-०८-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवविकास कार्यक्रमाअंतर्गत आयोजित केल्या जाणाऱ्या आरोग्य शिबीरामध्ये रुग्णांना जेवणासाठी रु.६५/- अनुदान देण्याची तरतूद केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नाशिक जिल्ह्यामध्ये आयोजित शिबीरांमध्ये रुग्णांना जेवण न देता केवळ कांदा पोहे किंवा खिचडी देऊन अनुदान लाटण्याचा प्रकार माहे एप्रिल २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास या प्रकरणाची शासनाने सखोल चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले व संबंधित कंत्राटदारांवर काय कारवाई करण्यात आली ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
शिबीरामधील रुग्णांना जेवन देण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### लातूर जिल्हयात प्राथमिक आरोग्य केंद्रात मुलभूत सुविधांसह रिक्त पदांमुळे रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

**(१६) २५१६३ (१४-०८-२०१५). श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात ग्रामीण भागात एकूण ४६ प्राथमिक आरोग्य केंद्र असून या ठिकाणी एकूण ९२ वैद्यकीय अधिकारी गट-अ, तसेच १० तालुक्यांना आरोग्य अधिकारी यांची पदे मंजूर असताना त्यापैकी अनेक पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,

(२) लातूर जिल्हयातून दरवर्षी सुमारे ५ ते ६ वैद्यकीय अधिकारी सेवाअंतर्गत पदव्युत्तर शिक्षणाकरिता ३ वर्षाच्या कालावधीसाठी जात असतानाही सध्या ती रिक्त पदे भरण्यात येत नसल्यामुळे जनतेला नाहक आरोग्य सेवेपासून वंचित व्हावे लागत आहे, हेही खरे आहे काय,

(३) सेवार्थ प्रणाली अस्तित्वात येण्यापूर्वी मात्र सेवांतर्गत पदव्युत्तर शिक्षणाकरिता गेलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदी नवीन नियुक्ती केली जात होती व त्यामुळे संबंधित आरोग्य सेवेमार्फत दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवेवर विपरीत परिणाम होत नव्हता, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, लातूर जिल्ह्यातील रिक्त असलेली वैद्यकिय अधिकाऱ्यांची सर्व पदे विनाविलंब भरण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती ठोस कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

लातूर जिल्ह्यात ४६ प्राथमिक आरोग्य केंद्रे मंजूर आहेत. आकृतीबंधानुसार प्रत्येक प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता २ वैद्यकीय अधिकारी याप्रमाणे ९२ वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर आहेत व त्यापैकी ९० पदे भरलेली आहेत. तसेच लातूर जिल्ह्यामध्ये मंजूर असलेल्या १० तालुका आरोग्य अधिकाऱ्यांची पदेही भरलेली आहेत.
(२) व (३) अंशत: खरे आहे.

आरोग्य विभागांतर्गत कार्यरत वैद्यकीय अधिकारी सेवांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रतिनियुक्ती/अध्ययन रजेवर जात असतात व अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर त्यांच्या अभ्यासक्रमानुसार त्यांच्या सेवा जनतेस उपलब्ध करुन देण्यात येतात. पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या कालावधीत त्यांच्या जागेवर इतरत्र कार्यरत असलेल्या स्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांना अतिरिक्त कार्यभार देण्यात येतो किंवा बंधपत्रित आणि अस्थायी वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात येते व त्यांच्यामार्फत रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्यात येतात.

अभ्यासक्रमासाठी गेलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांचे वेतन मूळ पदावरुनच काढण्यात येत असल्यामुळे अशा रिक्त पदी नवीन नियुक्ती दिल्या जात नाहीत, ही बाब खरी आहे. अशा नियुक्त्या करणे शक्य व्हावे यासाठी अधिसंख्य पदे निर्माण करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील दोन सिकलसेलग्रस्त महिलांना प्रवास सवलत नाकारण्यात आल्याबाबत

**(१७) २५२८५ (१४-०८-२०१५). श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सिकलसेलग्रस्तांना मोफत प्रवास असे शासनाने जाहीर केले असतानाही जळगाव जिल्ह्यातील पाचोरा तालुक्यातील दोन सिकलसेल आजाराने गंभीर असलेल्या रुग्णांची प्रशासनाकडून अवहेलना झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिकलसेलग्रस्त महिलांना मोफत रुग्णवाहिकेसह प्रवास सवलतही नाकारण्यात आल्याने मुंबईपर्यंत जीवघेणा प्रवास करावा लागला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सिकलसेल रुग्णांना शासनाकडून जाहीर करण्यात आलेली सवलत न मिळण्याची कारणे काय आहेत,
(४) तातडीने अशा रुग्णांना मोफत प्रवास देण्याबाबत शासन कार्यवाही करणार आहे काय?

**डॉ. दीपक सावंत (३०-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

जळगाव जिल्ह्यातील एका सिकलसेलग्रस्त महिलेला पुढील उपचारासाठी औरंगाबाद येथे संदर्भित करण्यात आले होत. परंतु सदर महिलेने औरंगाबाद येथील रुग्णालयात जाण्यास निर्णय घेतला.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) होय, शासनतर्फे १०८ क्र. च्या रुग्णवाहिकेची सोय तसेच, दिनांक १० मार्च, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार सिकलसेल रुग्ण व त्याच्या एका मदतनिसासह मोफत एस.टी. प्रवासाची सुविधा देण्यात आली आहे.

---

**राधानगरी (जि.कोल्हापूर) तालुक्यातील दोन लाख लोकसंख्येचे आरोग्य केवळ सात वैद्यकीय अधिकाऱ्यावरं सुरु असल्याबाबत**

**(१८) २५४०९ (१४-०८-२०१५). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील दोन लाख लोकसंख्येचे आरोग्य केवळ सात वैद्यकीय अधिकाऱ्यावरं सुरु असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुक्यात वैद्यकीय अधिकाऱ्यांची अनेक पदे रिक्त असून सेवेवर कोणाचाच अंकुश नसल्याने लोकांना खाजगी तसेच बनावट डॉक्टरांकडे धाव घ्यावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने सखोल चौकशी केली आहे काय त्यात काय आढळून आले तदनुसार सदर पदे तात्काळ भरण्याबाबत शासन स्तरावर काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.

कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यामध्ये आरोग्य विभागाच अखत्यारितील २ ग्रामीण रुग्णालये, ६ प्राथमिक आरोग्य केंद्रे व १ आरोग्य पथक कार्यान्वित आहेत.

आकृतीबंधानुसार ग्रामीण रुग्णालयामध्ये प्रत्येकी ३, प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये प्रत्येकी २ व आरोग्य पथकाकरीता १ याप्रमाणे वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे मंजूर आहेत. एकूण ९ आरोग्य संस्थांकरीता मंजूर असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच १९ पदांपैकी ११ स्थायी, १ बंधपत्रित व २ अस्थायी यानुसार एकूण १४ पदे भरलेली आहेत. रिक्त पदांचा कार्यभार अन्य वैद्यकीय अधिकाऱ्यांकडे देऊन रुग्णांना रुग्णसेवा देण्यात येत आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयांमध्ये कॉलेज ऑफ फिजीशियन्स आणि सर्जन मुंबई या संस्थेमार्फत पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याच्या निर्णयबाबत**

**(१९) २६३९६ (१७-०८-२०१५). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयांमध्ये कॉलेज ऑफ फिजीशियन्स आणि सर्जन मुंबई या संस्थेमार्फत पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरु करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे माहे मे, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या महत्वपूर्ण निर्णय कधीपासून अमंलात येणार आहे वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :**(१) होय.
शासनाने दिनांक ८.५.२०१५ च्या शासन निर्णयाने सार्वजनिक आरोग्य विभागाच्या रुग्णालयामध्ये कॉलेज ऑफ फिजीशियन ॲण्ड सर्जन या संस्थेच्या मार्फत पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे.
(२) दिनांक २७.११.२०१५ रोजी सुमपदेशनाद्‌वारे राज्यस्तरावरुन विविध जिल्हा रुग्णालयात सीपीएस कोर्सेससाठी उमेदवार भरण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ढाकेफळ (जि.औरंगाबाद) प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया झालेल्या महिलांची देखरेख करण्यासाठी एकही वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याबाबत**

**(२०) २६४७८ (१७-०८-२०१५). श्री.संदीपानराव भुमरे (पैठण) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ढाकेफळ (जि.औरंगाबाद) प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब नियोजनाची शस्त्रक्रिया झालेल्या महिलांची देखरेख करण्यासाठी एकही वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याची बाब दिनांक २४ मे, २०१५ रोजी च्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शस्त्रक्रिया झालेल्या महिलांना उलट्या, चक्कर, भोवळ येऊ शकते वा त्यांचे भान हरपू शकते या सर्व बाबींचा विचारा करता तेथे वैद्यकीय अधिकारी असणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासन कोणती कार्यवाही करीत आहे वा करणार आहे ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे आहे. प्राथमिक आरोग्य केंद्र, ढाकेफळ, जि.औरंगाबाद येथे एक वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे कान्हे (ता. मावळ) येथील ग्रामीण रुग्णालयात एकच वैद्यकीय अधिकारी असल्याबाबत**

**(२१) २६७०५ (१७-०८-२०१५). श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कान्हे (ता. मावळ) येथील ग्रामीण रुग्णालय एकच वैद्यकीय अधिका-यांवर सुरु असल्याचे माहे जून, २०१५ निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भागातील आरोपी आणि रुग्णांची तपासणी करीत तासन तास प्रतीक्षा करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :**(१) हे खरे नाही.
पुणे जिल्हयातील तालुका मावळ अंतर्गत काळेकॉलनी व वडगांवमावळ येथे ग्रामीण रुग्णालये कार्यरत आहेत. माहे जून, २०१६ मध्ये ग्रामीण रुग्णालय, वडगांवमावळ, ता.मावळ, जि.पुणे येथे मंजूर असलेल्या ३ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदावर २ स्थायी व १ बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी कार्यरत होते.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दोडी बु. (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील नाशिक पुणे महामार्गावरील तसेच नाशिक-शिर्डी महामार्गालगत असलेल्या ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२२) २६७६८ (१७-०८-२०१५). श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दोडी बु. (ता.सिन्नर, जि.नाशिक) येथील नाशिक पुणे महामार्गावरील तसेच नाशिक-शिर्डी महामार्गालगत असलेल्या ग्रामीण रुग्णालय दोडी बु. येथे ३०% लहान मुलांची OPD असून

तेथे बालरोग तज्ञ डॉक्टर, परिचारक व शव विच्छेदकाची रिक्त पदे तातडीने भरण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ५ जानेवारी, २०१५ रोजी पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वरील पदे भरण्यात आली आहे काय, तसेच याबाबत काय कार्यवाही केली आहे,

(३) अद्याप काही कार्यवाही नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :**(१) होय.

(२) ग्रामीण रुग्णालय, दोडी, ता.सिन्नर, जि.नाशिक येथे दिनांक २४.६.२०१५ पासून बंधपत्रित बालरोग तज्ञ वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. स्थायी स्वरुपात एका बालरोग तज्ञाची दिनांक १.१०.२०१५ च्या शासन निर्णयान्वये नामनिर्देशनाने नियुक्ती करण्यात आली आहे. सदर वैद्यकीय अधिकारी दिनांक २०.१०.२०१५ पासून रुजू झालेले आहेत. ग्रामीण रुग्णालयामध्ये परिचारक व शवविच्छेदकाचे पद मंजूर नसून सिन्नर नगरपालिकेतील शवविच्छेदकांमार्फत शवविच्छेदन केले जाते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जालना जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२३) २७४८८ (१७-०८-२०१५). श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रात मोठ्या प्रमाणात अधिकाऱ्यांची पदे रिक्त आहेत तसेच स्त्रियाना शस्त्रक्रिया करण्यासाठी भूलतज्ञ डॉक्टर नसल्याने खाजगी रुग्णालयातून उपचार करावे लागत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनामार्फत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद् नुसार जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकाऱ्यांची व डॉक्टरांची रिक्त पदे तातडीने भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (२९-०३-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

जालना जिल्हयात ४० प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित असून आकृतीबंधानुसार ८० पदे मंजूर आहेत व त्यापैकी ६७ पदे भरलेली आहेत. परंतु आकृतीबंधानुसार प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता भूलतज्ञाचे पद मंजूर नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**यावल (जि.जळगांव) उपवन संरक्षक, वनविभाग अंतर्गत साग व इतर वृक्षांची तोड केल्याबाबत**

**(२४) २८५९६ (१३-०१-२०१६). श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यावल (जि.जळगांव) उपवन संरक्षक, वनविभाग जळगांव यांच्या अंतर्गत असलेल्या मनुदेवी मंदिरा मागील कम्पार्टमेंट क्र.१४९ चे वन रक्षक के ए पाटील यांना डि एफ ओ दहिवले यांनी त्यांच्या हद्दीत १६५ साग व ८ आडजात जातीच्या वृक्षांची तोड केल्याप्रकरणी माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निलंबित केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वृक्षांची तोड करण्यास सामुहिक जबाबदारी असताना केवळ एकटया वनरक्षकांवर कारवाई करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी जबाबदार असणा-या इतर अधिका-यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१२-०५-२०१६) :**(१) यावल वन विभागातील मनुदेवी बिटाचे कक्ष क्र.१४९ मध्ये १६५ साग व ८ इंजायली वृक्षांची तोड झाल्याप्रकरणी संबंधित वनरक्षक श्री.के.ए.पाटील यांना दिनांक ८-९-२०१५ अन्वये निलंबीत करण्यात आले आहे.

(२) यावल वन विभागातील यावल पश्चिम वनक्षेत्रातील मनुदेवी बिटामध्ये दिनांक ७.९.२०१५ रोजी उपवनसंरक्षक, यावल यांना साग व इंजायली वृक्षांची तोड झाल्याचे आढळून आले. तत्कालीन वनरक्षक मनुदेवी बिट यांनी साग-१६५ व इतर इंजायली ८ झाडांची तोड झाल्याचे सांगितले होते. तोडलेली सर्व झाडे जागेवरच पडून होती. सविस्तर तपासणीमध्ये एकूण साग वृक्ष २६८ व इंजायली २२ वृक्षांची तोड झाल्याचे आढळून आले.

अवैध वृक्षतोडीच्या पाहणीत व पंचनाम्यात कक्ष क्र. १४९ मध्ये झालेली वृक्षतोड ही १५ ते २० दिवसांपूर्वीचीच असल्याचे दिसून आले. श्री.के.ए.पाटील, वनरक्षक यांनी त्यांच्या नियमतक्षेत्रामध्ये नियमित गस्त करुन झालेल्या अवैध वृक्षतोडीचा वनगुन्हा नोंदविणे तसेच याबाबत त्यांचे वरिष्ठांना वेळीच कळविणे आवश्यक होते, परंतू त्यांनी तसे केले नाही. हलगर्जीपणामुळे त्यांना दिनांक ८.९.२०१५ पासून शासन सेवेतून निलंबीत करण्यात आलेले आहे.

(३) सदर घटना तत्कालीन वनरक्षक मनुदेवी श्री.ए.के. पाटील यांचे दुर्लक्षितपणामुळे घडली असल्याने व अवैध वृक्षतोड प्रकरणी वेळीच गुन्हा नोंदविण्याची त्यांची प्राथमिक जबाबदारी असताना त्यांनी प्रकरणी विहित मुदतीत वनगुन्हा नोंदविलेला नसल्याने त्यास ते स्वत: जबाबदार असल्यामुळे इतर अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात आलेली नाही.

---

**कोल्हापूर येथील बालवाडी शिक्षिका व सेविकांच्या प्रलंबीत मागण्याबाबत**

**(२५) २९४७३ (१२-०१-२०१६). डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील बालवाडी शिक्षिका, सेविकांना प्रलंबीत वेतन मिळावे, विद्यार्थ्यांना पोषण आहार मिळावा या मागण्याबाबत बालवाडी शिक्षीका व सेविकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर माहे ऑगस्ट, २०१५ वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बालवाडी शिक्षीका व सेविकांना प्रलंबित वेतन व विद्यार्थ्यांना पोषण आहार मिळावा यासाठी शासनाने निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप, कार्यवाही केली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१६) :**(१) होय, हे खरे आहे.
(२) अंगणवाडी सेविकास व मदतनीस यांचे माहे डिसेंबर, २०१५ अखेर मानधन अदा करण्यासाठी अपुदान वितरीत करण्यात आलेले असून सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या खात्यावर जमा करण्याची कार्यवाही चालू आहे. अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या राज्य शासन मानधनात दिनांक ३०/४/२०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार वाढ करणेत आलेली आहे. सदर वाढीत अनुदानाच्या फरकाची रक्कम अंगणवाडी संविका व मदतनीस यांच्या खात्यावर जमा करण्याची कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील स्वयंसहायत्ता बचत गटांच्या डिजिटायझेशनचा नाबार्ड ई शक्ती हा उपक्रम राबविण्यात येण्याबाबत

**(२६) २९६०६ (१२-०१-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील स्वयंसहायत्ता बचत गटांच्या डिजिटायझेशनचा नाबार्ड ई शक्ती हा उपक्रम राबविण्यात येईल अशी माहिती मा. मुख्यमंत्री यांनी दिली असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उपक्रम राबविण्याबाबत शासनाने निर्णय घेवून कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) अद्याप कार्यवाही केली नसल्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१६) :**(१) होय.
(२) सदर उपक्रम प्रायोगिक तत्वावर नाबार्डमार्फत राबविण्यात येत असून त्यामध्ये महिला व बाल विकास विभागांतर्गत असलेल्या महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) चे धुळे कार्यालय सहभागी आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील किनखेडा परिसरात गेल्या सहा महिन्यांपूर्वी मंजुरात मिळालेल्या कोल्हापूरी बंधाऱ्याच्या दुरुस्तीला अद्याप सुरुवातच केली नसल्याबाबत**

**(२७) २९७५१ (१२-०१-२०१६). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रिसोड (जि.वाशिम) तालुक्यातील किनखेडा परिसरात गेल्या सहा महिन्यांपूर्वी मंजुरात मिळालेल्या कोल्हापूरी बंधाऱ्याच्या दुरुस्तीला अद्याप सुरुवातच केली नसल्याने शेतकऱ्यांना सिंचनापासून वंचित रहावे लागत असल्याचे दिनांक १ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांवर एकामागून एक कोसळणाऱ्या नैसर्गिक व मानवी संकटातून सावरत असताना प्रशासनाची दप्तर दिरंगाईमुळे शेतकऱ्यांच्या आणखी अडचणी वाढत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी बंधाऱ्याची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत व शेतकऱ्यांच्या अडचणी सोडविण्याबाबत शासनाने काय कार्यवाही वा उपाययोजना केली आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१६) :**(१) मौ. मसलापेन कोल्हापूर पध्दती बंधारे दुरुस्तीचे काम कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, वाशिम कार्यालयांतर्गत असून १० ऑक्टोंबर, २०१५ रोजी सदर कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे गेट बसविण्यात आलेले असून पाणी अडविण्यात आलेले आहे.

(२) व (३) बंधाऱ्याचे दुरुस्तीचे काम रब्बी हंगामाचे सुरुवातीलाच झालेले असून बंधाऱ्यात पाणी अडविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील नागरीकांना दर्जेदार आणि तत्पर आरोग्य सेवा पुरविण्यासाठी आरोग्य विभागातील डॉक्टरांची ४०० पदे तातडीने भरण्याचे आदेश**

**(२८) ३०३६७ (२१-०१-२०१६). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील नागरीकाना दर्जेदार आणि तत्पर आरोग्य सेवा पुरविण्यासाठी आरोग्य विभागातील डॉक्टरांची ४०० पदे तातडीने भरण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री महोदयांनी मंत्रालयातील आरोग्य विभागाच्या आढावा बैठकीत दिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही पदे तातडीने भरण्याकरिता शासनाच्या आरोग्य विभागामार्फत कोणता ठोस निर्णय घेण्यात आला, त्यानुषंगाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (१९-०५-२०१६) :**(१) होय.

(२) सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थांमधील वैद्यकीय अधिकारी गट- अ ची रिक्त पदे भरण्याकरिता स्वतंत्र निवडमंडळामार्फत पात्र ठरलेल्या ४६६ एमबीबीएस अर्हताधारक उमेदवारांना दिनांक १८.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये वैद्यकीय अधिकारी गट - अ या पदावर नियुक्तीचे आदेश देण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### वाई (जि.सातारा) तालुक्यातील ओझर्डे येथील अंगणवाडीची भिंत कोसळल्याबाबत

**(२९) ३०५०९ (१२-०१-२०१६). श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाई (जि.सातारा) तालुक्यातील ओझर्डे येथील सन २००९ मध्ये एकात्मिक बालविकास योजनांतील बांधण्यात आलेली अंगणवाडीची भिंत कोसळली सुदैवाने यात जिवीतहानी झाली नसली तरी बांधकामाच्या निकृष्ट दर्जामुळेच ही भिंत कोसळली असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन ही अंगणवाडी बांधणा-या ठेकेदारावर कोणती कारवाई केली आहे वा करण्या येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास होणा-या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.

मौजे ओझर्डे, ता.वाई, जि.सातारा येथील अंगणवाडी केद्र क्र. ८ या अंगणवाडीच्या इमारतीमध्ये शौचालयाच्या लगतच्या भिंतींना भेगा पडल्या होत्या. एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प कार्यालय वाई यांनी बांधकाम विभागास कळविल्यानंतर बांधकाम विभागाने संबंधित मक्तेदाराकडून माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये पश्चिम व दक्षित बाजूला भेगा पडलेल्या दोन्ही भिंती उतरवून पुन्हा बांधकाम दुरुस्ती करुन घेतली आहे. सद्य:स्थिती सदरची इमारत सुस्थितीत आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मौजे-बोरीचामाळ, पोस्ट-तळेगांव (ता.तळा, जि.रायगड) येथे पक्या स्वरुपाचा आर.सी.सी. बंधारा होणेबाबत

**(३०) ३०६८९ (१२-०१-२०१६). श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे-बोरीचामाळ, पोस्ट-तळेगांव (ता.तळा, जि.रायगड) येथे जलसंधारण विभागांतर्गत पक्या स्वरुपाचा आर.सी.सी. बंधारा होणेबाबत या विषयावरील दिनांक ०७ मे, २०१५ रोजीचे निवेदन लोकप्रतिनिधी अणुशक्तीनगर, मुंबई येथील मा.जलसंधारण मंत्री यांना दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या संदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) अद्यापपर्यंत कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत आणि याप्रकरणी कार्यवाही केव्हा करण्यात येणार आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१६) :**(१) होय,
(२) सदर निवेदनाच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, ठाणे यांच्याकडून प्रत्यक्ष कार्यक्षेत्रावर प्राथमिक सर्वेक्षण करण्यात आले असून त्यानुसार सविस्तर सर्वेक्षण अंदाजपत्रकांची कार्यवाही प्रगतीपथावर आहे,
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अंबरनाथ नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये असलेल्या अंगणवाड्यातून मिळणारा निकृष्ट दर्जाचा आहार तसेच अंगणवाड्यांच्या आलेल्या दुरवस्थेबाबत**

**(३१) ३०९४२ (१२-०१-२०१६). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबरनाथ नगरपरिषदेच्या हद्दीमध्ये असलेल्या १०३ अंगणवाड्या पैकी अनेक अंगणवाड्यांची झालेली दुरवस्था व अंगणवाड्यातून मुलांना मिळणारा निकृष्ट दर्जाचा आहार यामुळे कुपोषित बालकांचे वाढते प्रमाण याची शासनाने चौकशी करावी व त्या अनुषंगाने कार्यवाही करावी अशी मागणी स्थानिक लोक प्रतिनिधींनी दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी मा. महिला व बाल कल्याण मंत्री यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने आतापर्यंत काय निर्णयात्मक कार्यवाही केली आहे व सद्य:स्थिती काय आहे,
(३) अद्याप, निवेदनातील मागणीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली नसल्यास त्याची कारणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१६) :**(१) होय,
दिनांक २७/०४/२०१५ रोजीचे निवेदन प्राप्त झाले आहे.
(२) अंबरनाथ बाल विकास प्रकल्पामध्ये एकूण २१ महिला मंडळ / बचत गटांमार्फत शासनाचे निकषानुसार आहार पुरवठा करण्यात येतो. तसेच दर ६ महिन्यातून एकदा शासकीय प्रयोगशाळेतून आहाराची तपासणी केली जाते. प्रकल्प कार्यालयातील मुख्यसेविका तथा बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्यामार्फतही अंगणवाडी भेटी दरम्यान आहाराची तपासणी केली जाते. काही त्रुटी असल्यास त्यानुसार सदर महिला मंडळ / बचतगट यांच्यावर दंडात्मक

कार्यवाही करण्यात येते. दरमहा प्रत्येक अंगणवाडीत माता समिती बैठका घेतल्या जातात व विभागातील महिलांकडून आहाराची चव, दर्जा, इत्यादी बाबत आढावा घेतला जातो.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत केंद शासनाकडून अंगणवाडी इमारतीच्या भाडेकरिता दरमहा रुपये ७५०/- देण्यात येतात. सदर रक्कमेमध्ये काही भागात इमारत भाडयाने मिळणे अडचणीचे होते. महिला व बाल विकास विभागाकडून अंगणवाडी केंद्र इमारत बांधकामासाठी रु.६.०० लाख दिले जातात. स्थानिक लोकप्रतिनिधीकडे अंगणवाडी इमारत जागा उपलब्ध करुन देणेबाबत प्रकल्प कार्यालयाकडून पाठपुरावा करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील उपमुख्य कार्यकारी अधिकारी एकात्मिक बालविकास पद रिक्त असल्याबाबत

**(३२) ३१०८८ (१२-०१-२०१६). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील उपमुख्य कार्यकारी अधिकारी एकात्मिक बालविकास पद मागील वर्षभरापासून भरले गेले नसल्याचे माहे, ऑगस्ट २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात कुपोषणाचा प्रश्न गंभीर आहे तसेच या जिल्ह्यातील अंगणवाड्यातील कारभार खुप महत्वाचा असूनही प्रश्न भाग १ मधील पद रिक्त असुन या जिल्ह्याच्या विकासाला हातभार लावणाऱ्या जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, महिला व बालविकास अशा दोन विभागाचा कारभार जुन्या ठाणे जिल्ह्यातूनच चालू आहे हे पाहता शासन त्वरीत आवश्यक कार्यवाही करणार वा करीत आहे काय,

(३) नसल्यास, यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१६) :**(१) होय अंशत: खरे आहे.

(२) शासन पत्र मबाआ-२०१४/प्र.क्र. १५१/का-७ दि.३१.०७.२०१४ अन्वये सदर पदांचा अतिरिक्त कार्यभार श्री.पी.एम. भावसार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क) जिल्हा परिषद,ठाणे यांचेकडे देण्यात आला होता. तसेच शासन निर्णय क्र.मबाआ-२०१५/प्र.क्र.१५१(भाग-२) का-७ दि.०२.०१.२०१६ अन्वये महिला व बालविकास अधिकारी जिल्हा परिषद, पालघर या पदावर श्री.राजेंद्र एम पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पनवेल, जि.रायगड यांच्या प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रत्नागिरी जिल्ह्यातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे मानधन गत चार महिन्यांपासून प्रलंबित असल्याबाबत

**(३३) ३१९३६ (१२-०१-२०१६). श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयातील अंगणवाडी कर्मचारी अत्यल्प मानधनावर ग्रामीण भागात काम करीत असताना या कर्मचाऱ्यांची मानधन माहे मे, २०१५ पासून चार महिने देण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हयातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित प्रश्न घेऊन अंगणवाडी कर्मचारी सभा संघटनेने दिनांक ९ ऑक्टोबर, २०१५ रोजी मोर्चा काढून आपले निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.रत्नागिरी यांना दिले हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, मानधनासाठी आंदोलन छेडल्यानंतर प्रकल्प अधिकारी आणि सुपरवायझर यांच्याकडून कामावरुन कमी करण्याच्या धमक्या दिल्या जात आहे हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मानधन न देण्याची सर्वसाधारण कारणे कोणती,

(६) असल्यास, अंगणवाडी कर्मचाऱ्यांना मानधन देण्याबाबत कोणती तातडीची कार्यवाही करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे नाही.

(४), (५) व (६) रत्नागिरी जिल्हयातील अंगणवाडी कर्मचाऱ्यांचे केंद्र शासनाचे मानधन माहे नोव्हेंबर, २०१५ पर्यंत अदा करण्यात आलेले आहे. माहे डिसेंबर, २०१५ व जानेवारी, २०१६ चे मानधन अदा करण्याकरिता निधी उपलब्ध करण्याची कार्यवाही सुरु आहे.

राज्य शासनाने मानधन माहे जानेवारी, २०१६ अखेरपर्यंत अदा करण्यात आलेले आहे. माहे फेब्रुवारी २०१६ चे मानधन कोषागारातून अदा करण्याची कार्यवाही चालू आहे.

---

## हिंगोली जिल्हयातील कयाधू नदीवर २५० हेक्टर पेक्षा कमी सिंचन क्षमतेचे बंधारे बांधण्याबाबत

**(३४) ३३१०७ (१५-०१-२०१६). श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयातील कयाधू नदीचे पाणी अद्याप कुठेही अडविले न गेल्यमुळे पूर्णत: वाहन जाते तसेच हिंगोली जिल्हयात सिंचनाचा अनुशेष मोठया प्रमाणावर असल्यामुळे कयाधू नदीवर बंधाऱ्यांची कामे होणे अत्यंत आवश्यक आहे, त्याकरित २५० हेक्टर पेक्षा कमी सिंचन

क्षमता असलेले बंधारे १.सेनगाव, २.जांभरुन रोडगे, ३.ब्रम्हपूरी, ४.गिलोरी व ५.घोटा या ठिकाणी होऊ शकतात असे सर्वेक्षणातून निष्पन्न झाल्यामुळे सदर बंधारे बांधण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यासंदर्भात मा. ग्रामविकास व जलसंधारण मंत्री यांना स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे मार्च, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनावर आतापर्यंत काय कार्यवाही करण्यात आली,

(३) असल्यास, कयाधू नदीवर बंधारे बांधून जिल्ह्यातील सिंचनाचा अनुशेष दूर करण्यासंदर्भात शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१६) :**(१) होय, अंशत: खरे आहे. निवेदन मार्च, २०१५ मध्ये दिलेले नसून दिनांक १९ नोव्हेंबर, २०१४ रोजी दिलेले आहे.

१) सेनगाव २) जांभरुन रोडगे ३) ब्रम्हपुरी ४) गिलोरी व ५) घोटका या ठिकाणी कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्यांचे सर्वेक्षण करण्यात आले असून मान्यतेची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) व (३) उपरोक्त पाच ठिकाणी सर्वेक्षण करुन अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली असून सदर पाच बंधाऱ्यांचे अंदाजपत्रके मंजुरीची कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन समितीच्या सचिवांच्या मानधनामध्ये वाढ करण्याबाबत**

**(३५) ३३३०४ (१२-०१-२०१६). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्रात पाणलोट व्यवस्थापन समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू व्यवस्थापन समित्यांच्या अंतर्गत ग्रामसभेच्या माध्यमातून सचिवांव्दारा शेती सिंचनासाठी पुरविण्यात येणा-या पाण्याचे व्यवस्थापन करण्याची जवाबदारी आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू व्यवस्थापन समित्यांच्या सचिवांना नाममात्र रुपये ३०००/- मानधन देण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू सचिवांना देण्यात येणाऱ्या नाममात्र मानधनात वाढ करून प्रशिक्षण व अन्य सुविधा देण्याचा धोरणात्मक निर्णय राज्य शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(५) नसल्यास, सर्वसाधारण करणे काय ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१६) :**(१) होय. सामईक मार्गदर्शक सूचना-२००८ (सुधारीत २०११) अन्वये पाणलोट प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामसभेद्वारे पाणलोट समितीची स्थापना करण्यात आली.

(२) सामाईक मार्गदर्शक सूचना-२००८ (सुधारीत २०११) नुसार पाणलोट समितीच्या सहाय्याखेरीज सचिवांकडे कोणत्याही जबाबदाऱ्या नसतील व पाणलोट समिती अध्यक्षाच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली काम करेल.

(३) होय. पाणलोट समिती सचिवांना दरमहा रु. ३०००/- मानधन व रु. ५००/- इतका प्रवासभत्ता देण्यात येतो.

(४) नाही.

(५) सचिवांच्या सेवा हया प्रकल्प कालावधीपुरत्याच असल्याने व त्यांच्या सेवा सेवाभावी स्वरुपाच्या असून त्यांनी त्यांचे वैयक्तिक काम सांभाळून सेवा करावयाच्या असल्याने, त्यांच्या वैयक्तिक काम सांभाळून सेवा करावयाच्या असल्याने, त्यांच्या मानधनात वाढ करण्यात आलेली नाही.

---

## उस्मानाबाद जिल्हयातील शहरी अंगणवाड्याअंतर्गत सेविका व मदतनीस यांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(३६) ३३७६९ (१२-०१-२०१६). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील शहरी अंगणवाडया अंतर्गत कार्यकर्ती व मदतनीस यांची रिक्त पदे भरण्याबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांना दिनांक ९ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने कुठलीच कार्यवाही झाली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासन कोणती व केव्हा कार्यवाही करणार आहे

(४) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे कोणती ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१६) :**(१) होय.

(२) व (३) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय ,दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ अन्वये एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या नियुक्तीच्या अटी व शर्तीमध्ये सुधारणा करणेबाबतच्या सूचना निर्गमित केलेल्या आहेत. तद्नंतर महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय दिनांक ०२ मार्च, २०१५ अन्वये ज्या प्रकल्पाकडून दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ पुर्वी अंगणवाडी सेविका, मदतनीस पदांच्या भरतीबाबत दिनांक ५ ऑगस्ट, २०१० व दिनांक १५ सप्टेंबर, २०११ च्या शासन निर्णयानुसार जाहिरात दिलेला आहे त्या प्रकल्पांनी ही मानधनी पदे भरण्याची प्रक्रिया दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंत पुर्ण करावी. जर ही निवड प्रक्रिया दिनांक ३१ मार्च, २०१५ पर्यंत पुर्ण झाली नाही तर ती आपोआप रद्द होईल त्यामुळे अशी भरतीप्रक्रिया नव्याने दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ च्या शासन निर्णयान्वये तातडीने पुर्ण करण्यास मान्यता दिलेली आहे. तसेच बालविकास प्रकल्प अधिकारी (नागरी) उस्मानाबाद यांना उपरोक्त शासन निर्णयातील

तरतूदीनुसार कार्यवाही करण्यास उपआयुक्त (अंगणवाडी), एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) ग्रामीण भागात जंगलतोडीमुळे मानवी जीवनासह वन्य प्राण्यांचे अस्तित्वाला निर्माण झालेला धोका**

**(३७) ३४००४ (१३-०१-२०१६). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण तालुक्यातील (जि.रत्नागिरी) ग्रामीण भागात जंगलतोडीला वनविभागातर्फे सन २०१४-२०१५ या वर्षात किती पास देण्यात आलेले होते,
(२) असल्यास, याबदल्यात किती वृक्ष लागवड करण्यात आली आहे,
(३) असल्यास, यामध्ये नांदिवसे, दुर्गेवाडी, स्वयंदेव, मूर्तवडे, सुतारवाडी, टेरव, वारेली आदि गावांमध्ये मोठया प्रमाणात लाकूड माफियांकडून जंगलांची तोड केली जात असल्याची बाब वनविभाग चिपळूण यांच्या माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, जंगले ओसाड होत असल्याने वन्य प्राणी वस्तीत येऊ लागल्याने मानवी जीवनाला धोका निर्माण होऊन त्यामुळे मानवी जीवनासह वन्यप्राण्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, प्रश्न भाग (३) बाबत लाकूड माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे,
(६) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (०९-०५-२०१६)** :(१) सन २०१४-१५ या वर्षात चिपळूण तालुक्यामध्ये खाजगी क्षेत्रात एकूण १८९ प्रकरणी वृक्षतोडीस परवानगी देण्यात आलेली आहे व एकूण ५१४४ निर्गत पास देण्यात आलेले आहेत.
(२) चिपळूण तालुक्यात एकूण १८९ झाडतोड प्रकरणी निर्बंधित प्रजातीचे १३,०३६ झाड तोडीस परवानगी देण्यात आली होती. या वृक्षतोडीची अनुषंगाने १३,०३६ रोपाची पर्यायी लागवड करणेत आलेली आहे.
(३) नांदिवसे, दुर्गेवाडी, स्वयंदेव, टेरव आदि गावपैकी टेरव या गावामध्ये माहे सप्टेंबर, २०१५ या कालावधीत खाजगी मालकीच्या क्षेत्रात विना परवाना वृक्षतोडीच दोन घटना घडलेल्या आहेत. सदर दोन घटनामध्ये एकूण ७ झाडे विना परवाना तोड झालेबाबत महाराष्ट्र वृक्षतोड (विनियमन) अधिनियम-१९६४ मधील तरतुदीनुसार संबंधिताकडून रु.३,५००/- दंड वसूल करणेत आलेला आहे.
(४) हे खरे नाही.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**एकात्मिक बालविकास योजनेचे काम करणाऱ्या मुख्य सेविकांनी पदोन्नतीसाठी मोर्चा काढल्याबाबत**

**(३८) ३४०४४ (१२-०१-२०१६). श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सुरेश लाड (कर्जत) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) एकात्मिक बालविकाय योजनेचे काम करणाऱ्या मुख्य सेविकांनी आझाद मैदान मुंबई येथे पदोन्नतीसाठी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मोर्चाचे आगमन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोर्चेकऱ्यांच्या मागण्या कोणकोणत्या मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत,

(३) तसेच उर्वरित मागण्यांबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१६) :**(१) हे खरे आहे.

(२) मुख्यसेविकेच्या संवर्ग वर्ग करणे, नागरी प्रकल्पात वर्ग-२ चे पद निर्माण करणे, इतर विभागातील अधिकाऱ्यांना बाल विकास प्रकल्प अधिकारी पदावर घेण्यात येऊ नये, अंगणवाडी सेविकांमधून पर्यवेक्षिका म्हणून पदोन्नती कर्मचाऱ्यांची ५०% सेवा ग्राह्या धरण्यात यावी, मुख्यसेविकांना फिक्स्ड टीएडिएम, मोफत लॅपटॉप, मोबाईल खर्च, मुख्यसेविकांची रिक्त पदे भरण्यात यावी, सहाय्यक बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना बाल विकास अधिकारी म्हणून पदोन्नती देण्यात यावी.

वर्ग-३ व वर्ग-४ ची पदे महिला व बाल विकास विभागाकडे वर्ग करण्यास ग्राविकास विभागाने नकार दिला आहे.

(३) उर्वरित मागण्यांबाबत वेळोवेळी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

**राज्यातील ४४ निरिक्षण गृहामधील (रिमांड होम) वर्ग ३ व ४ या कर्मचा-यांना ५ व ६ वा वेतन आयोगाचा फरक दिलेला नसल्याने ही फरकाची रक्कम मिळणेबाबतचे**

**(३९) ३४८९३ (१२-०१-२०१६). श्री.बाळासाहेब सानप (नाशिक पूर्व) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ४४ निरिक्षण गृहामधील (रिमांड होम) वर्ग ३ व ४ या कर्मचा-यांना वेतन आयोग लागू करण्यात आला परंतु त्यांना ५ व ६ वा वेतन आयोगाचा फरक दिलेला नसल्याने ही फरकाची रक्कम मिळणेबाबतचे निवेदन मा.मुख्यमंत्री व मा.महिला व बाल विकास मंत्री यांना नाशिक पूर्व लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या ४४ निरिक्षण गृहाच्या कर्मचा-यांना फरकाची रक्कम व इतर शासकीय कर्मचा-यांना मिळणा-या सोई सुविधा मिळणे बाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१६) :**(१) होय.

(२) शासन निर्णय क्र निरीगृ-१०९९/प्र.क्र.४०२/का-३ दिनांक १९ ऑगस्ट, २००४ अन्वये जिल्हा परीविक्षा अनुरक्षण संघटने मार्फत सुरु असलेल्या निरीक्षणगृहातील कर्मचाऱ्यांना पाचव्या वेतन आयोगाच्या शिफारशींप्रमाणे सुधारीत वेतनश्रेणी लागु करण्यात आलेली आहे. त्यामध्ये वेतन निश्चिती १ जानेवारी, १९९६ पासून करण्यात यावी मात्र दिनांक १ जानेवारी, १९९६ ते ३१ मार्च, २००४ पर्यंतची थकबाकी रक्कम कर्मचाऱ्यांना देय हेणार नाही असे स्पष्ट आदेश दिले आहेत. तसेच शा.नि.क्र. निरिगृह-२००९/प्र.क्र.१५७/का-३, दि.२३ ऑगस्ट, २०१० अन्वये या कर्मचाऱ्यांना सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे सुधारी त वेतनश्रेणी मंजुर करण्यात आली आहे. या शा.नि.मध्येही दि.१/१/२००६ ते ३१/३/२०१० या कालावधीची थकबाकी अनुज्ञेय असणार नाही असे आदेश शासनस्तरावरुन यापूर्वीच दिलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महिला व बालविकास विभागामार्फत राज्यातील शासनमान्य बालगृहांच्या तपासणीमध्ये बहुतांश बालगृहे अपात्र ठरल्याबाबत

**(४०) ३५२४० (१२-०१-२०१६). श्री.धनजंय (सुधीर) गाडगीळ (सांगली) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिला व बालविकास विभागामार्फत राज्यातील शासनमान्य बालगृहांच्या तपासणीमध्ये बहुतांश बालगृहे अपात्र ठरल्याची बाब माहे ऑगस्ट २०१५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या तपासणीच्या अहवालामध्ये अनेक त्रुटी आढळल्या आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या संबंधीत दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची काय कारणे आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१६) :**(१), (२) व (३) हे खरे नाही,

तथपि, ज्या संस्थांची तपासणी करण्यात आली आहे, त्यामधील काही संस्थांमयये त्रुटी आढळून आलेल्या आहेत. त्यानुसार संस्थांची वर्गवारी “अ”, “ब”, “क” श्रेणीमध्ये करण्यात आलेली आहे.

तपासणीदरम्यान काही संस्थाचालकांनी मा.न्यायालयात याचिका दाखल केल्या होत्या. सदर याचिकावर मा.न्यायालयाने तपासणी करण्यास हरकत नाही, तथापि अंतिम निर्णय घेण्यात येऊ नये असे आदेश दिलेले आहेत. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कनाशी (ता.कळवण, जि.नाशिक) प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर उपस्थित राहत नसल्याबाबत

**(४१) ३५७८३ (२१-०१-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कनाशी (ता.कळवण, जि.नाशिक) प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर उपस्थित राहत नसल्याने आदिवासी जनतेचे अतोनात हाल होत असल्याने ग्रामस्थांनी प्राथमिक आरोग्य केंद्र बंद असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक आरोग्य केंद्र डॉक्टरविना ओस पडल्याने आदिवासी जनतेला खाजगी दवाखान्याचा आधार घ्यावा लागतो, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरण चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, त्यानुसार सदरहू प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर व कर्मचाऱ्यांची उपस्थिती कायम ठेवण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०५-२०१६) :**(१) अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

प्राथमिक आरोग्य केंद्र कनाशी, ता.कळवण, जि.नाशिक येथे वैद्यकीय अधिकाऱ्यांची मंजूर असलेली आदोलन  दोन्ही पदे भरलेली आहेत. तथापि, सदर वैद्यकीय अधिकारी सेवांतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी गेलेले असल्याने त्यांच्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र जयदर येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रतिनियुक्तीचे आदेश देण्यात आले असून त्यांच्यामार्फत रुग्णसेवा पुरविण्यात येत आहे.

(३) होय.

(४) प्राथमिक आरोग्य केंद्र, कनाशी येथील प्रतिनियुक्ती केलेले वैद्यकीय अधिकारी आणि तेथील कर्मचारी यांना नोटीस देण्यात आली असून मुख्यालयी राहून आरोग्य सेवा पुरविण्याबाबत सक्त सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चांदवड तालुक्यातील (जि.नाशिक) हिरापूर ग्रामपंचायतीत अंगणवाडी सेविका भरतीसाठी लागणारी कागदपत्रे खरी असतानाही दुसऱ्याच उमेदवारांची नेमणूक करण्यात आल्याबाबत

**(४२) ३६६४१ (१२-०१-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदवड तालुक्यातील (जि.नाशिक) हिरापूर ग्रामपंचायतीत अंगणवाडी सेविका भरतीसाठी लागणारी कागदपत्रे खरी असतानाही दुसऱ्याच उमेदवारांची नेमणूक करण्यात झाल्याचा प्रकार माहे ऑक्टोबर, २०१५ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त भरती प्रकरणी नागरिकांनी संबंधित निवड करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, त्यानुसार काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) असल्यास, अपात्र उमेदवारांची निवड रद्द करुन पात्र उमेदवारास नेमणूक देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घाटंजी (जि. यवतमाळ) तालुक्यातील कोल्हापूरी बंधारे बांधणेकरिता मान्यता मिळणेसंदर्भातील प्रस्ताव**

**(४३) ३६८४४ (१२-०१-२०१६). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घाटंजी (जि. यवतमाळ) तालुक्यातील कोल्हापूरी बंधारे बांधणेकरिता नियोजित बंधा-यांच्या स्थळाची यादी देवून शासन स्तरावर निधी उपलब्ध होणे तसेच प्रशासकीय मान्यता मिळणेसंदर्भात प्रस्ताव सादर करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना दिनांक २४ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनावर कोणती कार्यवाही करण्यात आली आहे,
(३) असल्यास, त्याचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(४) नसल्यास, त्याचे कारण काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१६) :**(१) होय,
(२) स्थळपाहणी करुन सविस्तर सर्वेक्षणाची अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेकरीता जिल्हाधिकारी यवतमाळ यांना सादर करण्यात आली,
(३) मा. लोकप्रतिनिधी यांनी सुचविलेल्या यादीतील वाघाडी नदीवरील प्रस्तावित स्थळांची पाहणी करण्यात आली असून ७ नवीन योजनांच्या सविस्तर सर्वेक्षणाची अंदाजपत्रके सादर करण्यात आली आहेत. तसेच या नदीवर जिल्हा परिषद, सिंचन व लघु सिंचन (जलसंधारण) विभाग यवतमाळ, या विभागाचे ७ बंधारे यापूर्वी बांधण्यात आले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील मुंबईत स्थित डोंगरी निरीक्षणगृहाच्या इमारतीची झालेली दुरावस्था

**(४४) ३८२०४ (१२-०१-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **महिला व बाल कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबईत स्थित डोंगरी निरीक्षणगृहाच्या इमारतीची दुरवस्था झाल्याने त्यातील मुला मुलींना उमरखाडीमधील आशा सदन तसेच माहिम मधील डेव्हिड ससून औद्योगिक शाळेत हलविण्यात आले तसेच या ठिकाणी आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अखत्यारितील संघटनेमार्फत माहे डिसेंबर मध्ये मुंबईत बाल न्यायालयाविषयी आंतरराष्ट्रीय कार्यक्रमाच्या पार्श्वभूमिवर मुंबईतील निरीक्षण गृहाविषयी घेण्यात यावयाच्या दक्षतेबाबत शासनाने आजवर कोणती कार्यवाही केली वा प्रस्तावित आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१६) :**(१) निरीक्षणगृहाच्या इमारतीची दुरावस्था झालेली नसून, निरीक्षणगृहाच्या बाजुला असलेला जेलर्स बंगला हा दुरावस्थेत होता.

मात्र, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल झालेल्या जनहित याचिका क्र.११५/२०१४ मध्ये मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार सदर जेलर्स बंगला जमिनदोस्त करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे डेव्हिड ससून औद्योगिक शाळा, माटुंगा येथे दिनांक २७.११.२०१४ रोजी ३९ मुले व आशा सदन येथे २ मुली हलविण्यात आल्या होत्या. डेव्हिड ससून औद्योगिक शाळा तसेच आशा सदर येथे आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत.
(२) सदर प्रकरणी प्रधान सचिव, महिला व बाल विकास यांनी उमरखाडी संस्थेस भेट देऊन सुधारणा करण्याच्या अनुषंगाने संबंधितांना सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार संस्थेतील आवश्यक सोयी-सुविधा प्राप्त करुन घेण्याविषयी सार्वजनिक बांधकाम खाते यांच्या मार्फत सर्व्हे करण्यात येत आहे.

निरिक्षणगृह उमरखाडी, येथे बाल अपचारी प्रवेशितांना राहण्यासाठी ७५ प्रवेशिता राहू शकतील अशी क्षमता असलेले निरिक्षणगृह बांधण्यासाठी रु.२३२.८१ लक्ष इतकी तरतूद केलेली आहे. त्यापैकी सार्वजनिक बांधकाम खात्यास रु.१६२.९७ लक्ष निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत काम करणारे कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या मागण्याबाबत

**(४५) ३८६८४ (१२-०१-२०१६). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील एकात्मीक पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत काम करणारे कंत्राटी कर्मचारी आपल्या विविध मागण्यासाठी आयुक्त कार्यालय पुणे धडक मोर्चा काढला असल्याचे माहे जुलै, २०१५ च्या पहिला आठवडयात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, याबाबत विलंबाची कारणे काय आहेत, याबाबत सद्यस्थिती काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१६) :**(१) होय.
(२) सर्व कंत्राटी पाणलोट विकास पथक कर्मचाऱ्यांच्या सेवा बी.व्ही.जी. इंडिया लि. या सेवा पुरवठादार कंपनीमार्फत माहे ऑक्टोंबर, २०१५ पासून प्रकल्प कालावधीसाठी घेण्यात आल्या आहेत. कार्यरत कंत्राटी कर्मचारी यांना एससआयसी, कामगार भविष्य निधी, बोनस व रजा इ. लाभ, सेवा पुरवठादार यांचे मार्फत देण्यात येत आहेत. पाणलोट विकास पथक सदस्यांना सन २०१४-१५ मध्ये एकत्रित मानधन रु.१०,०००/- वरुन रु.१३,०००/- करण्यात आले आहे. त्यानुसार वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा पुणे कार्यालयाकडून सर्व प्रकल्प व्यवस्थापक तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना कर्मचाऱ्यांचे मानधन व फरक त्वरीत अदा करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जलसंधारण कामांत जुन्या पाझर तलावांच्या दुरुस्तीच्या कामांचा समावेश करण्याबाबत**

**(४६) ३८९०२ (२१-०१-२०१६). ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंधारण कामात जुन्या पाझर तलावांच्या दुरुस्तीचे काम हाती घेता येत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलसंधारणाच्या कामात जुन्या पाझर तलावांच्या दुरुस्तींचे कामे हाती घेण्यासाठी सदर कामांच्या निकषात बदल करण्याबाबत शासनाने आजतागायत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१६) :**(१) नाही
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मंदाणे (ता.शहाद, जि.नंदुरबार) येथील राहट्यावड धरणाची नवीन सुप्रमा मंजूर करण्याबाबत**

**(४७) ३९११० (२०-०१-२०१६). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंदाणे (ता.शहाद, जि.नंदुरबार) येथील राहट्यावड धरणाची सद्यस्थिती काय आहे,

(२) असल्यास, धरणाची नवीन सुप्रमा मंजुरीची नस्ती मागील दोन वर्षापासून संबंधित विभागाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०५-२०१६) :**(१), (२) व (३) ल.पा. योजनेच्या सा.क्र. ० ते ६३० मी धरण संरेखेत व त्या जागी असलेल्या बुडीत क्षेत्र व धरणाच्या संरेखेच्या निम्न भागाचे वन जमीनीत अतिक्रमण केलेल्या प्लॉट धारकांनी कामास विरोध केल्यामुळे जाने. २००५ पासून काम बंद आहे. मार्च २०१२ मध्ये कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, धुळे यांनी कार्यक्षेत्रीय पाहणी करुन धरणाची संरेखा उर्ध्व बाजूस सरकविणेचा प्रस्ताव सादर केला व त्यानुसार ह्या अतिक्रमण धारकांच्या जमीन कार्यक्षेत्राच्या बाहेर होत आहे. या प्रस्तावास अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, नाशिक यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन हा प्रस्ताव मा.मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) पुणे यांचेमार्फत शासनास सादर केला असून काही क्षेत्र वगळल्यामुळे धरणातील कमी होणारा पाणीसाठा कायम ठेवण्यासाठी धरणाची उंची सा.क्र. ० ते १३१० मीटर मध्ये ४० सें.मी. ने वाढविण्याबाबत कामाचा अंतर्भाव सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठीच्या अंदाजपत्रकात करण्यात आलेला आहे. त्यानुसार सदर योजनेचे रु.८४९.१३ लक्ष किंमतीचे सुधारित अंदाजपत्रक शासनास सादर करण्यात आले असून सदर प्रस्तावास मान्यता देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामीण भागातील जनेतला आरोग्य सेवा पुरविण्यासाठी सुरु करण्यात आलेली डॉक्टरांची भरती प्रक्रिया पूर्ण झाली नसल्याबाबत**

**(४८) ३९४२० (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील लोकांना आरोग्य सेवा पुरविण्यासाठी गेल्या दीड वर्षापासून १८०० डॉक्टरांची सुरु केलेली भरती प्रक्रिया अद्यापही पूर्ण न झाल्यामुळे ग्रामीण भागातील जनता केवळ प्रशासनाच्या आडमुठेपणामुळे आरोग्य सेवेपासून वंचित राहिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने अधिक चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार याप्रकरणी जबाबदार असणा-या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) भरती प्रक्रिया तातडीने पुर्ण करुन तातडीने डॉक्टरांची नियुक्ती करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे ?

**डॉ. दीपक सावंत (०९-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही.

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत आरोग्य संस्थांमध्ये वैद्यकीय अधिकारी गट - अ संवर्गाची १८८१ पदे भरण्याकरीता स्वतंत्र निवडमंडळामार्फत दिनांक ५.१०.२०१३ रोजी जाहिरात देण्यात आली होती. स्वतंत्र निवडमंडळामार्फत पात्र ठरलेल्या १४५० उमेदवारांना माहे एप्रिल, २०१४ ते मे, २०१५ मध्ये वैद्यकीय अधिकारी गट- अ पदावर नियुक्ती आदेश देण्यात आले आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रत्नागिरी जिल्हयात पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत सव्वा कोटीचा निधी अखर्चित राहिल्याबाबत**

**(४९) ३९६२४ (२१-०१-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्हयात पाणलोट विकास कार्यक्रमातंर्गत विकास कामासाठी जिल्हा कृषी विभागाकडे प्राप्त झालेला सुमारे सव्वा दोन कोटीचा निधी अखर्चित राहिल्यामुळे पाणलोट विकास अंतर्गत मंजूर झालेल्या ३१० कामापैकी २६३ कामे अपूर्ण असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या प्रकरणी जबाबदार असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१२-०५-२०१६) :**(१) हे खरे नाही. सन २०१५-१६ मध्ये रत्नागिरी जिल्हयात पाणलोट व्यवस्थापन कार्यक्रमांतर्गत २०१५-१६ मध्ये पाणलोट विकासाची पुढील कामे करण्यात आली आहेत: (i) सलग समतल चर - ३७६.२० हेक्टर, (ii) वनीकरण - ५.१७ हेक्टर, (iii) फळबाग- १०.४६ हेक्टर, (iv) मजगी-११.०१ हेक्टर, (v) बांधबंधीस्ती दुरुस्ती- ७८.१० हेक्टर, (vi) अनगड दगडी बांध-१९०९, (vii) शेततळे-८, (viii) मातीनाला बांध-४, (ix) सिमेंट नालाबांध-५७, (x) वळण बांध-२२.

सन २०१५-१६ मध्ये सदर कामांवर रु.८५३.८१ निधी खर्च झाला आहे तसेच अखर्चित निधी रक्कम रु.१०८.०० लाख एवढा आहे.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयातील उप वन संरक्षकांनी केलेला आर्थिक गैरव्यवहार**

**(५०) ५३२०६ (११-०३-२०१६). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड वन विभागात उपवन संरक्षक यांनी ते दिनांक १७ मार्च, २०१५ ते ०१ एप्रिल, २०१५ या कालावधीत विदेश दौ-यावर असतांना त्यांनी त्यांच्या पदाचा कार्यभार दुस-या अधिका-यांकडे सोपवून परत आल्यानंतर दौरा कालावधीतील तारखेमध्ये ५० ते ६० लक्ष रुपयांचे देयकांवर सही करुन देयके पारित करुन अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपवन संरक्षक विदेश दौ-यावर असतांना त्यांनी त्यांचा पदभार इतर अधिका-याकडे दिला होता. त्याच कालावधीत पदभार देण्यात आलेल्या अधिका-यांनी त्यांच्या स्वाक्षरी सह इतर कांही बिले मंजूर केले व विदेश दौ-यावर असलेल्या अधिका-यांनी त्यांच्या स्वाक्षरीसह कांही बिले मंजूर केली असल्याची बाब निदर्शनास आली आहे हे हीखरे आहे का,
(३) सदरील अधिका-यांकडे पदभार असतांना विदेश दौ-यावर गेलेल्या अधिका-यांनी त्याच कालावधीत सहया केल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यावर शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (२१-०३-२०१६) :**(१), (२), (३), (४) व (५) नांदेड वनविभागातील उपवनसंरक्षक यांना दिनांक १३ मार्च, २०१५ ते ५ एप्रिल, २०१५ या कालावधीत प्रशिक्षणाकरिता पाठविण्यात आले होते. त्यांनी दिनांक ६ एप्रिल, २०१५ रोजी कामावर रूजु झाल्यानंतर प्रशिक्षण दौरा कालावधीतील देयके पारित केली आहेत किंवा कसे याबाबत सदर देयक महालेखाकार कार्यालयाकडून प्राप्त करून याबाबत सविस्तर चौकशी करण्यात येत आहे.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.